चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

३० जानेवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ३०/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, माजरी, ब्रम्हपुरी, भिसी, तळोधी, पाथरी, सिंदेवाही, राजुरा, कोठारी, जिवती, कोरपना** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२३** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०३** आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **३,२३,६००/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची दारूबंदीवर कारवाई

## जलनगर भागातुन दोन आरोपीसह २७ लक्ष रू. दारूचा मुदद्देमाल जप्त

दि. ३१/०१/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, जलनगर वार्ड येथील दिनेश खंजर, विष्णु खंजर आणि दोन महिला यांनी महीन्द्रा बोलेरो गाडी ने देशी विदेशी दारू बोलावली असुन ती दारू यातील एका महिलेच्या घरी खाली करीत आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जलनगर भागात मिळालेल्या माहितीप्रमाणे सदर महिलेच्या घराजवळ पोहचले असता, तिचे घरासमोर एक महीन्द्रा बोलेरो गाडी क्र. एम एच ४० वाय ९५८८ ही उभी होती. सदर वाहनाजवळ दोन स्त्रिया उभ्या असुन काही ईसम गाडीमधुन दारूच्या पेटया उतरवित होते. पोलीस पथकास पाहुन काही इसम त्याठिकाणाहुन पळुन गेले तर दोन महिला वाहनाजवळ मिळुन आल्या. सदर महिला आरोपींना ताब्यात घेंवुन विचारपुस करून त्यांच्या घराची आणि वाहनाची झडती घेतली असता, विदेशी दारूने भरलेल्या मॅकडॉल नंबर १ कंपनीच्या ४२ पेटया किं. ६,०४,८००/—रू. विदेशी दारूने भरलेल्या ऑफीसर चॉईस ब्लु कंपनीच्या ४६ पेटया किं ६,६२,४००/—रू. विदेशी दारूने भरलेल्या ऑफीसर चॉईस कंपनीच्या ५९ पेटया किं. ८,४९,६००/—रू. देशी दारूने भरलेल्या रॉकेट संत्रा कंपनीच्या २० पेटया किं. २,००,०००/—रू. एक महीन्द्रा बोलेरो गाडी क्र. एम एच ४० वाय ९५८८ किं. ४,००,०००/—रू. असा **एकुण २७,१६,८००/—रू.** चा माल मिळुन आला. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांच्या मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. ओ. जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, पोउपनि. जितेंद्र वैरागडे यांचे सह स.फौ. दौलत चालखुरे, पदमाकर भोयर, पो हवा. महेद्र भुजाडे, विजय संगीडवार, ना. पो.शि. अमजद खान, अवीनाश दशमवार, रवींद्र बोरकर, पो.शि. प्रांजल झिलपे, कुंदनसिंग बावरे, रवीन्द्र पंधरे, जावेद सिददीकी, म.पो.शि. सिमा सावळे, प्रिया पोले, भारती खरकाटे, चा.पो.शि. वामन ढाकणे, शेखर आसुटकर यांनी पार पाडली.

---